मराठा विद्या प्रसारक समाजाचे,
**कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा**
ता. बागलाण जि. नाशिक (महाराष्ट्र) पिन - ४२३ ३०१.
दूरध्वनी : (०२५५५) २२३०४२ कार्या. २२३०७५ निवास फॅक्स : ०२५५५ - २२३०४२
पुणे विद्यापीठाशी संलग्न अनुक्रमांक पुवि / नाशिक / कवावि / ००८ /१९६७
नॅक ए ग्रेड मानांकीत व पुणे विद्यापीठाचा ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
Center Code : 026
College Code : 052
Website : www.satanacollege.com
E-mail : nmsasc@yahoo.co.in

**प्राचार्य डॉ.किशोर पवार**
एम्.एस्सी.पीएच.डी.
आदर्श शिक्षक पुरस्कार : महाराष्ट्र शासन
सर्वोत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार : पुणे विद्यापीठ
आदर्श शिक्षक पुरस्कार : मराठा विद्या प्रसारक समाज
नॅक पियरटिम सदस्य : बंगलोर

Ref.No. - STN/3139 / /2015 2016 Date : 20 /11 /2015

# प्रशस्ती पत्र

डॉ. धनसिंग चौधरी हे माझे मित्र असून गेली अनेक वर्षे ते संमोहनशास्त्रावर आधारित कार्यक्रम करीत आहेत. नाशिक मध्ये त्यांनी अनेक शाळा महाविद्यालयांमध्ये मनोरंजना बरोबरच या शास्त्राची शास्त्रीय बैठक ही विशद केली आहे. त्यांचे हे कार्यक्रम अत्यंत प्रभावी व ज्ञानवर्धक ठरले. अलिकडच्या धावपळीच्या, धकाधकीच्या तणावग्रस्त जीवन शैलीमुळे अनेक लोक आपले मानसिक स्वास्थ हरवून बसतात. त्याचा परिणाम शारीरीक आरोग्यावरही होतो. स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांवरही हे परिणाम जाणवतात. संमोहनाच्या माध्यमातून या परिस्थितीवर मात करण्यासाठी डॉ. चौधरी यांनी कार्यशाळा सुरु केल्या.अंतर्मनाच्या शक्तीचा कसा वापर करायचा याचं शास्त्रशुध्द तंत्र त्यांनी संमोहनाद्वारे विकसित करण्यावर भर दिला. त्याचा फायदा अनेक लोकांना, विद्यार्थ्यांना झाल्याचे त्यांनी आपल्या पुस्तकात नमूद केले आहे. औद्योगिक कंपन्यांमध्ये कर्मचा-याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अनेक प्रगतराष्ट्रे संमोहनशास्त्राचा वापर करुन अपेक्षित बदल घडवून आणतात. एखादी व्यक्ती संमोहनशास्त्रातील ज्ञान अवगत करुन तज्ञ म्हणून विविध मानसिक आजारांवर उपचार करु शकते. आणि त्याचा फायदा रुग्णांना होऊ शकतो. डॉ. चौधरी यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन दिशा दिली आहे. अनेकांना त्यांच्या कार्यशाळेचा फायदा झाला आहे. भीती, ताणतणाव दूर झाले आहेत. मी देखील काही केसेस त्यांच्याकडे पाठविल्या होत्या. संमोहनशास्त्र हे एक विज्ञान आहे. त्याला जागतिक आरोग्य संघटना, केंद्रशासन यांनी एक उपचार पध्दती म्हणून मान्यता दिली आहे. डॉ. चौधरी यांच्या कार्यशाळेचा अनेक पालक, विद्यार्थी, कामगार, व डॉक्टरांनीही लाभ घेतला आहे.

(प्राचार्य डॉ. किशोर पवार)
विज्ञान लेखक, अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचा सक्रीय कार्यकर्ता.